# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. एमडीएफ/ओडी/१६२०/जन, दिनांक - १७.०९.२०१८

## परिपत्रक

**विषय :-** मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३१७ नुसार उत्सव/समारंभाकरिता तातुपरते मंडप उभारण्याची परवानगी प्राप्त करण्यापूर्वी मंडप उभारणी सुरु केल्यास करावयाच्या निष्कासन कारवाईबाबत व जिल्हाधिका-यांच्या अधिपत्याखालील "अनधिकृत मंडप शोध पथकाने" शोधलेल्या अनधिकृत मंडपांचे निष्कासन करण्याबाबत.

**संदर्भ :-** १) मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. क्र. १७३/२०१०, दि.१३/०३/२०१५, २४/०६/२०१५, १७/०७/२०१५ आणि १०,११,१२ व १६ ऑगस्ट २०१६ वर पारित केलेले आदेश.

२)बृहन्मुंबई महानगरपालिकेचे धोरण क्र.अति.आयुक्त/पूउ/४४६२/III दि.२४.०७.२०१५.

३) परिपत्रक क्र. एमडीएफ/ओडी/३०९८/जन, दि. ३०.०१.२०१७.

४) परिपत्रक क्र. एमडीएफ/ओडी/४१८/जन, दि. १२.०५.२०१७.

५) परिपत्रक क्र. एमडीएफ/ओडी/९१७/जन, दि. १३.०७.२०१८.

६) परिपत्रक क्र. एमडीएफ/ओडी/१४०९/जन, दि. ३०.०८.२०१८.

जनहित यचिका क्र. १७३/२०१० मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे तंतोतंत पालन करण्याच्या उद्देशाने सर्व विभागीय सहाय्यक आयुक्त व त्यांचे अधिनस्थ अधिकारी/कर्मचा-यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

मा. न्यायालयाने जनहित याचिका क्र. १७३/२०१० मध्ये जारी केलेल्या दि. १०/११/१२ व १६ ऑगस्ट २०१६ आदेशांमधील परिच्छेद क्र. ९४ मधे दिलेले निर्देश खालीलप्रमाणे आहेत.

**94 (xii)** *We direct that the discretionary powers under the section 234 of the said Act of 1949 and Section 317 of the said Act of 1888 to grant permission to erect temporary booths or similar structures on streets(including footpaths/footways) for holding of festivals/ceremonies shall be exercised by the Commissioners subject to the law laid down by this Court in this Judgment and Order. We also direct the Municipal Corporations to take immediate action of demolition in respect of the temporary booths/ structures erected on public streets without obtaining the requisite permissions. Such action shall be taken even before the religious festivals/functions commence. We also direct that whenever such permissions are granted, a condition shall be incorporated therein of prominently displaying a copy of permission and the material particulars of such permission on the temporary booths or structures covered by Section 234 of the said Act of 1949 and Section 317 of the said Act of 1888. Any booth or pandal which does not display such permission shall be demolished/removed;*

५-२

94 (xiii) *While exercising the power under section 234 of the said Act of 1949 and Section 317 of the said Act of 1888, the Commissioners of the Municipal Corporations shall be bound to ensure that the fundamental right of citizens to have roads and foot-paths and/or footways in a reasonable condition and free of obstructions which is guaranteed by Article 21 of the Constitution is not violated*

94 (xiv) *We direct the District Collectors of all the Districts in the State to constitute a team of Revenue Officers not below the rank of Tahsildars for each Municipal Corporation area. The members of the team shall regularly visit the areas within the limits of the Municipal Corporations for a period of 7 days before the date of commencement of the major religious festivals and during the festivals to ascertain whether any temporary booths/structures have been erected on public streets and foot-paths/footways without obtaining permission of the Municipal Commissioners. Any such structure which does not display the permission and material details thereof shall be deemed to be illegal. The members of the team shall be under an obligation to immediately bring to the notice of the concerned Municipal officers/designated officers, the temporary booths erected on streets and footpaths or footways without obtaining permission of the Commissioners or in breach of the conditions in permissions. The Municipal Authorities shall forthwith take action of removal on the basis of such information. Even the Municipal Corporations shall constitute a team of Officers who will carry out the same task which is entrusted to the Revenue Officers as above. These directions shall be implemented immediately;*

94 (xix) *In the event, the Municipal Commissioners or the Municipal Staff or the members of the team constituted by the Collectors need police help and protection for the implementation of this Judgment and Order or the implementation of the provisions of law, on an application being made by them, all concerned local police station shall forthwith provide adequate police protection to them;*

94 (xxiv) *We direct the State Government to take action against the authorities constituted under the Noise Pollution Rules in the event of their failure to take prompt action as contemplated by Sub-Rule (2) of Rule 7 and Rule 8 of the Noise Pollution Rules as the failure on their part results in to violation of fundamental rights under Article 21 of the Constitution of India. The Municipal Corporation shall take action against the officers who fail to take immediate action of demolition of illegal booths/ pandals on streets. Allowing construction of illegal pandals/ booths on streets also violates the fundamental right of the citizens under Article 21 of the Constitution of India;*

वरिल मुद्यांमधील मा. न्यायालयाचे आदेश लक्षात घेता खालीलप्रमाणे कार्यवाही अपेक्षित असून ती अत्यंत प्रभावीपणे होणे गरजेचे आहे.

(१) महापालिकेद्वारा मुंबई महापालिका अधिनियमाच्या कलम ३१७ अन्वये दिलेल्या परवानगीशिवाय रस्त्यावर/पदपथावर उभारण्यात येणारे मंडप/पंडाल इ. हे अनधिकृत असतील तर त्यांचे त्वरीत निष्कासन करणेत यावे. ही कारवाई उत्सव किंवा समारंभ सुरु होणेपूर्वी देखील करावयाची आहे.

(२) जेव्हा केव्हा तात्पुरत्या मंडप/पंडाल इ. ना कलम ३१७ खाली परवानगी देण्यात येते तेव्हा त्या परवानगीची प्रत त्वरीत मंडपाच्या बाह्य प्रवेशद्वारावर ठळकपणे दिसेल अशा पद्धतीने संपूर्ण

तपशीलासह प्रदर्शित करणे गरजेचे व आवश्यक आहे. ज्या मंडपावर/पंडाल इ. वर अशी परवानगी प्रदर्शित केलेली नसेल त्यांचे त्वरीत निष्कासित करण्यात यावे.

(३) नागरिकांचा रस्त्यावर व पदपथावर चालण्याचा अधिकार हा भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ प्रमाणे मूलभूत अधिकार आहे हे लक्षात घेवून तो अबाधित राहील याची कटाक्षाने दक्षता घ्यावी. रस्ते व पदपथ हे या अधिकारान्वये तारतम्य बाळगून (reasonable condition) अडथळारहित असतील याची काळजी घ्यावी.

(४) प्रत्यक्ष मुख्य उत्सव/ समांरभापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयाव्दारे जी अनधिकृत मंडप शोध पथके गठीत करण्यात येतात ती पथके उत्सवाच्या ७ दिवस आधी तपासणी करतील याची दक्षता घ्यावी. <u>तपासणी उत्सव सुरु होण्यापूर्वीच्या केवळ ७ दिवसातच करावी असे न्यायालयाचे स्पष्ट निर्देश आहेत.</u>

तपासणी अंतर्गत ज्या मंडपांवर परवानगी प्रदर्शित केलेली नसेल ते मंडप अनधिकृत समजण्यात येतील. संबधित महसूल खात्याचा पथकाचा प्रमुख (तहसीलदार) ही बाब त्वरीत अनधिकृत मंडपांच्या निष्कासन करणा-या महापालिका अधिका-यांच्या लक्षात आणून देईल तदंनतर पुढील २४ तासात महापालिकेच्या अधिका-याव्दारे सदर अनधिकृत मंडपांचे न चुकता निष्कासन करणेत यावे.

(५) जिल्हधिकारी कार्यालयातील महसूल खात्याच्या अनधिकृत मंडप शोध पथकांच्या भेटीनंतर कोणत्याही विनापरवानगी/अनधिकृत मंडपाला परवानगी देण्यात येऊ नये. महसूल खात्याच्या अनधिकृत मंडप शोध पथकाने भेट देऊन अनधिकृत ठरवलेल्या मंडपांना परवानगी देऊन नियमीत करु नये. असे करणे हा माननीय न्यायालयाचा अवमान ठरतो याची कटाक्षाने नोंद घ्यावी व असे अनधिकृत ठरवलेले मंडप विनाविलंब, अहवाल प्राप्त होताच पुढील २४तासात पो लीस बंदोबस्त घेऊन निष्कासित करावेत.

(६) जिल्हाधिकारी कार्यालयाची पथके महापालिकेच्या विभाग कार्यालयानुसार गठीत करणेत यावीत. यामुळे अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होईल व समन्वय योग्य राहील.

(७) प्रत्येक विभागीय सहाय्यक आयुक्ताने आपापल्या विभागासाठी विभागीय कार्यकारी अभियंता यांचे नियंत्राणाखाली एक अंतर्गत अनधिकृत मंडप शोध पथक (In-House Unauthorized Pandal Detection Team) देखील गठीत करून स्वत:च्या क्षेत्रात तपासण्या करावयाच्या आहेत. या पथकास आढळलेल्या अनधिकृत मंडपांवर वरीलप्रमाणेच विनाविलंब निष्कासन कारवाई करावी.

प-४

(८) जे अधिकारी वरील न्यायालयीन आदेशांचे पालन करणार नाहीत व नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे हनन करतील त्यांच्यावर शिस्तभंगाची कठोर कारवाई केली जाईल.

वरील सर्व सूचनांचे पालन काटेकोरपणे झाल्यास मा.न्यायालयाच्या आदेशाचे तंतोतंत पालन व प्रभावी अंमलबजावणी होईल.

सर्व सहाय्यक आयुक्तांनी प्रत्येक महत्वाच्या सण/ समारंभापूर्वी याबाबत पूर्व आढावा बैढका घ्याव्यात व नागरिकांच्या मुलभूत अधिकारांचे हनन होणार नाही याची काळजी घ्यावी.

18/9/18

उपायुक्त (परि.- दोन) | अतिरिक्त आयुक्त (पू. उ.) | महापालिका आयुक्त